0001

# नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचावे :- १) या कार्यालयाचे आदेश क्र.निशि/अंमल/६-अ/कावि/प्र.क्र.१०८/२०१०/जा.७१७, दि.२८/७/२०१०.
२) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, विलेपार्ले पोलिस ठाणे, मुंबई यांचा अहवाल दिनांक १४/०९/२०११.

क्र.निशि/अंमल/६-अ/कावि-/प्र.क्र.१०८/२०१०/जा. ८५३
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई २०..
दिनांक : २९/१०/२०११.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

## आदेश शुध्दीपत्र

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

या कार्यालयाचे वाचावे क्र. १ अन्वये पारित केलेल्या आदेशातील आदेश क्र. १ ते ३ मध्ये, "जप्त करण्यात आलेला टेम्पो क्र.एमएच-०६-जी-७२९३ या वाहनाच्या मालकाची पोलीसांनी खातरजमा करुन, त्यांच्या मालकास सदर वाहनाच्या सद्याच्या प्रचलीत बाजारमुल्याप्रमाणे येणाऱ्या रकमेपैकी ५० टक्के एवढ्या रकमेच्या राष्ट्रीयकृत बँकेच्या हमीवर सदर टेम्पो त्यांच्या मालकास परत करण्यात यावा.

सदरची बँक हमी या प्रकरणी नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्याचा न्यायालयीन निर्णय होईपर्यंत वेळोवेळी विहीत वेळेत नुतणीकरण करुन पोलिसांकडे देण्याची जबाबदारी टेम्पो मालकाची राहील.

या प्रकरणी नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्याचा न्यायालयीन निर्णय होईपर्यंत सदरहू टेम्पो विक्री करता येणार नाही व कोणासही हस्तांतरण करता येणार नाही " असे नमूद केलेले आहे.

वरिष्ठ पोलिस निरिक्षक, विलेपार्ले पोलिस ठाणे, मुंबई यांनी वाचावे क्र. २ अन्वये पाठविलेल्या अहवालात, सदर गुन्ह्यातील जप्त मुद्देमाला पैकी महिंद्रा डी आय ३२ टेम्पो क्र. एमएच-०६-जी-७२९३ वगळता उर्वरीत मुद्देमालाची विल्हेवाट लावून प्राप्त झालेली रक्कम शासनजमा करण्यात आलेली आहे.

तथापी, महिंद्रा डी आय ३२ टेम्पो क्र. एमएच-०६-जी-७२९३ याचे कागदपत्रांची पडताळणी केली असता मुळ मालक सौ. शालिनी चव्हाण नावाच्या महिला आढळून आल्या. त्यांनी सदरचा टेम्पो हा यातील आरोपी नामे धवल कमलेश शहा यांना विकला असल्याचे सांगितले. सदरची स्त्री ही शिंपोली गाव पनवेल याठिकाणी राहत असल्याने पोलिस ठाणेस येण्यास व कोणत्याही प्रकारे सहकार्य करण्यास नकार देत आहे. आरोपी धवल कमलेश शहा यांनी टेम्पो विकत घेतल्याचे मान्य केले आहे. त्यास वेळोवेळी संपर्क साधून पारीत केलेल्या आदेशानुसार

दिलेल्या शर्तीप्रमाणे टेम्पो घेवून जाण्यास वारंवार सुचना देवून देखील सदर इसम पोलिस ठाण्यास येत नाही. सदर जप्त टेम्पो क्र. एमएच-०६-जी-७२९३ हा पोलिस ठाणे समोरील खाजगी रस्त्यावर गेल्या पंधरा महिन्यांपासून बेवारस स्थीतीत पडला आहे. त्यामुळे वाहतूकीस अडथळा होत आहे व सदर टेम्पोमुळे डासांचा प्रादुर्भाव होवून रोगराई पसरण्याची शक्यता आहे. तरी सदरच्या टेम्पोच्या विल्हेवाटीबाबत योग्य आदेश होणेस विनंती केली आहे.

सबब, सदर आदेशातील आदेश क्र. १ ते ३ मध्ये या शुध्दीपत्रकानुसार सुधारणा करण्यात येत असून त्यामध्ये, "जप्त टेम्पो क्र. एमएच-०६-जी-७२९३ याची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरचे ट्रक लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे " असे वाचावे.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) टेम्पो क्र. एमएच-०६-जी-७२९३ चा चालक गजानन लक्ष्मण चव्हाण
२) टेम्पो क्र. एमएच-०६-जी-७२९३ चा मालक
३) टेम्पो क्र. एमएच-०६-जी-७२९३ चा क्लीनर सीराज रहमत खान
४) धवल कमलेश शहा
५) राहुल ऊर्फ मैय्युनुद्दीन
(वरिष्ठ पोलिस निरिक्षक, विलेपार्ले पोलिस ठाणे, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१. वरिष्ठ पोलिस निरिक्षक, विलेपार्ले पोलिस ठाणे, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.

२. उपनियंत्रक शिधावाटप, ड-परिमंडळ, यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.

३. वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई. यांना माहितीसाठी अग्रेषित.

४. निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.